IMPACT FACTOR 5.473(SJIF)
**UPA NATIONAL E-JOURNAL**
*Interdisciplinary Peer-Reviewed Journal*
ISSN 2455-4375

# भारतातील सामाजिक संस्थेतील परिवर्तन एक समाजशास्त्रीय अध्ययन

## (विशेष संदर्भ : गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुका)

**प्रा. डॉ. गजेंद्र एम. कढव**
समाजशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, जिल्हा – गडचिरोली
मो. नं. - ९९२२१८९२८२
Email - gajendrakadhav@gmail.com

---

***सारांश :***

*सामाजिक संस्था म्हणजे समाजातील लोकांनी एकत्र येऊन निर्माण केलेल्या अशा संरचना आहेत ज्या विशिष्ट सामाजिक गरजा पूर्ण करतात. भारतीय समाज हा हजारो वर्षांपासून विविध सामाजिक संस्थांवर आधारित आहे. या संस्था म्हणजे समाजाची चौकट असून त्या व्यक्तींच्या वर्तनाला एक दिशा देतात. परंतु काळाच्या ओघात, औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार, माहिती व तंत्रज्ञानातील विकास, तसेच जागतिकीकरण यामुळे भारतातील सामाजिक संस्थांच्या स्वरूपात आणि कार्यपद्धतीत मोठे बदल घडले आहेत. प्रस्तुत संशोधन हे गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील असून या तालुक्यामध्ये सामाजिक संस्थेमध्ये कश्याप्रकारचे परिवर्तन होत आहे याचे संशोधन प्रस्तुत संशोधन निबंधात केले आहे.*

**कीवर्ड :** औद्योगिकीकरण, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार, माहिती व तंत्रज्ञानातील विकास, जागतिकीकरण, वर्तन, शिस्त, संघटन व मूल्यसंस्था.

---

**प्रस्तावना :**

सामाजिक संस्था म्हणजे समाजातील लोकांनी एकत्र येऊन निर्माण केलेल्या अशा संरचना आहेत ज्या विशिष्ट सामाजिक गरजा पूर्ण करतात. त्या समाजात शिस्त, संघटन व मूल्यसंस्था निर्माण करतात. मॅक आयव्हर आणि पेज यांच्या मते "सामाजिक संस्था म्हणजे एक संघटित नमुना किंवा चौकट आहे, जी विशिष्ट सामाजिक गरजा पूर्ण करण्यासाठी समाजाने तयार केली आहे. **सामाजिक संस्था** या समाजाच्या रचनेतील अत्यंत महत्त्वाच्या व मूलभूत संरचना या समाजात शिस्त, नियम, मूल्ये, आणि कार्यपद्धती निर्माण करतात . समाजातील व्यक्ती एक घटक म्हणून त्याने आपले वर्तन, व्यवहार कसे करावे. कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडाव्यात आणि सामाजिक गरजा कशा पूर्ण कराव्यात, याचे मार्गदर्शन सामाजिक संस्था करतात. सामाजिक

संस्था या कोणत्याही समाजाच्या महत्वाच्या घटक असतात. व्यक्तीच्या विकासात आणि समाजाच्या संघटनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात . काळानुसार या संस्थांमध्ये परिवर्तन होत असतो, परंतु त्यांचे महत्त्व कायम राहते. प्रस्तुत संशोधन हे गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील असून या तालुक्यामध्ये सामाजिक संस्थेमध्ये कश्याप्रकारचे परिवर्तन होत आहे याचे संशोधन प्रस्तुत संशोधन निबंधात केले आहे.

**प्रमुख सामाजिक संस्था :**

1. **कुटुंब संस्था :** मूलभूत सामाजिक संस्था, जी व्यक्तीच्या जन्मापासून सुरुवात करते. व्यक्तीच्या जीवनातील पहिली संस्था. जन्म, पालनपोषण, संस्कार यासाठी ही महत्त्वाची संस्था आहे.
2. **विवाह संस्था :** समाजात स्थिरता, नैतिकता व कुटुंबनिर्मितीची प्रक्रिया नियंत्रित करणारी संस्था. ही संस्था स्त्री – पुरुषांचा लैंगिक सबंधांना समाजाची आणि कायद्यांची मान्यता मिळवून देते.
3. **धार्मिक संस्था :** ही संस्था लोकांच्या आध्यात्मिक गरजा, मूल्यसंस्था व नैतिक वर्तन घडवून आणते.
4. **शैक्षणिक संस्था :** ही संस्था लोकांच्या ज्ञान, कौशल्ये, सामाजिक मूल्ये व संस्कृतीचे हस्तांतरण करणारी संस्था आहे.
5. **आर्थिक संस्था :** ही संस्था समाजात उत्पन्न, संपत्ती आणि उत्पादन व्यवस्था नियंत्रित करणारी संस्था आहे. उत्पादन, वितरण आणि उपभोग यांचे नियमन करणारी संस्था संस्था म्हणजे आर्थिक संस्था होय.
6. **राजकीय संस्था :** समाजात शांतता, सुव्यवस्था निर्माण करणारी संस्था म्हणजे राज्य संस्था होय. ही संस्था सत्ता, कायदे आणि प्रशासनाचे नियमन करते.

**सामाजिक संस्थांचे कार्य :**

१. सामाजिक शिस्त आणि नियमांची अंमलबजावणी करणे

२. सामाजिक मूल्यांचा प्रसार करणे.

३. व्यक्तींचे समाजीकरण करणे.

४. मानवाच्या समाजमान्य मार्गाने गरजांची पूर्तता करणे.

५. सामाजिक स्थिरता आणि सलोखा राखणे.

**४. सामाजिक परिवर्तन घडवून आणणारे घटक :**

1. **शिक्षण :** परिवर्तनासाठी शिक्षण हा कळीचा घटक आहे.
2. **तंत्रज्ञान :** संवाद, माहिती व करमणूक या क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे बदल झाला.

3. **माध्यमं :** टीव्ही, सोशल मीडिया समाजमनावर प्रभाव टाकतात.
4. **कायदे व धोरणे :** घटनेने दिलेल्या अधिकारांमुळे सामाजिक न्यायाला चालना मिळाली.
5. **लोकशाही व मानवाधिकार :** व्यक्तिस्वातंत्र्य व हक्कांमुळे समाज अधिक खुले व समतावादी झाला.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता संशोधनकर्त्याने खालील संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे .

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१. सामाजिक संस्थेचा समाजावर झालेला सकारात्मक प्रभाव अभ्यासणे.
२. सामाजिक संस्थेचा समाजावर झालेला नकारात्मक प्रभाव अभ्यासणे.
३. सामाजिक संस्थेचा परिवर्तनामुळे लोकांच्या जीवनशैलीतील होणारे परिवर्तन अभ्यासणे .

**गृहीतकृत्य :**

१. सामाजिक संस्थेचा परिवर्तनामुळे लोकांच्या जीवनशैलीतील परिवर्तन होत आहे .
२. सामाजिक संस्थेचा परिवर्तनामुळे लोकांवर नकारात्मक आणि सकारात्मक असा दोन्ही प्रभाव पडत आहे.
३. सामाजिक संस्थेचा परिवर्तनामुळे स्त्रियांना स्वतःचे मत मांडण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे.

**नमुना निवड :**

प्रस्तुत शोधकार्यात संशोधनकर्त्याने गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील अंतरजी, पळसगाव आणि शिवनी गावाची निवड केली आहे. संशोधनकर्त्याने आरमोरी तालुक्यातील अंतरजी, पळसगाव आणि शिवनी या गावातील प्रत्येकी १० अशा एकून ३० नमुन्याची निवड सहेतुक नमुना निवड पद्धतीने संशोधनात केली आहे.

**तथ्य संकलन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात संशोधनकर्त्याने प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीतील मुलाखत- अनुसूचीच्या माध्यमातून तथ्य संकलन केले आहे. तसेच वर्तमान पत्र, पुस्तके, मासिके, इन्टरनेट या माध्यमातून द्वितीय्यक तथ्ये संकलित केले आहे.

**सामाजिक संस्थेतील परिवर्तन :**

प्रस्तुत शोधप्रकल्पात गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्यातील आरमोरी तालुक्यातील

अंतरजी, पळसगाव आणि शिवनी या गावातील प्रत्येकी १० अशा एकून ३० लोकांची मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून त्यांचे मुलाखती घेऊन माहिती संकलित करण्यात आली ही आकडेवारी खालील सारणीतून दिसून येते .

| प्रश्न क्र . | सामाजिक संस्थेतील परिवर्तन | प्रतिसाद | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| **व्ययक्तिक माहिती** | | | | |
| १ | वैवाहिक स्थिती | १९ (%३४.६३) | ११ (%६६.३६) | ३० (%१००) |
| २ | शैक्षणिक स्थिती | ३०(%००.१००) | ०(%००.००) | ३०(%१००) |
| ३ | लिंग | पुरुष<br>१५ )५०(%००. | स्त्री<br>१५ )५०(%००. | ३०(%१००) |
| **१. कुटुंब संस्थेतील परिवर्तन** | | | | |
| ४ | आपल्या कुटुंबात कुटुंब प्रमुख पुरुष आहे काय? | २०(%६७.६६) | १०(%३३.३३) | ३०(%१००) |
| ५ | आपल्या घरात संयुक्त कुटुंब पद्धती आहे काय ? | १२ (%००.४०) | १८ (%००.६०) | ३०(%१००) |
| ६ | गेल्या १०-१५ वर्षांत कुटुंब रचनेत काही बदल झाले आहेत का? | २०(%६७.६६) | १०(%३३.३३) | ३०(%१००) |
| ७ | तुमच्या मते महिलांची घरातील भूमिका कशी बदलली आहे. | १७ (%६७.५६) | १३ (%३३.४३) | ३०(%१००) |
| **२. विवाह संस्थेतील परिवर्तन** | | | | |
| ८ | समाजात आंतरजातीय/आंतरधर्मीय विवाहाला मान्यता आहे काय? | २४ (%००.८०) | ०६ (%००.२०) | ३० (%१००) |
| ९ | तुमच्या समाजात विवाह वयामध्ये काही बदल दिसून येतात का? | २५ (%३३.८३) | ५ (%६७.१६) | ३०(%१००) |
| १० | लिव्ह-इन रिलेशनशिपबाबत तुमचे मत काय आहे? | ०६ (%००.२०) | २४ (%००.८०) | ३०(%१००) |
| ११ | विवाह कालावधीत परिवर्तन होत आहे काय? | २५ (%३३.८३) | ५ (%६७.१६) | ३०(%१००) |
| **३. जाती संस्थेतील परिवर्तन** | | | | |
| १२ | तुम्हाला वाटते का की आजच्या काळात जातीचा प्रभाव कमी झाला आहे? | २४ (%००.८०) | ०६ (%००.२०) | ३० (%१००) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | तुम्ही आंतरजातीय लग्नास समर्थ आहात का? | १२ (%००.४०) | १८ (%००.६०) | ३०(%१००) |
| १४ | अस्पुष्य जातीतील व्यक्ती सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होतात का? | १७ (%६७.५६) | १३ (%३३.४३) | ३०(%१००) |
| १५ | आपण अस्पुष्यता मानता काय? | २४ (%००.८०) | ०६ (%००.२०) | ३० (%१००) |
| **४. धर्म संस्थेतील परिवर्तन** | | | | |
| १६ | धर्माचा तुमच्या दैनंदिन जीवनावर किती परिणाम होतो? | १७ (%६७.५६) | १३ (%३३.४३) | ३०(%१००) |
| १७ | धार्मिक सहिष्णुता वाढली आहे असे वाटते का | ०९ (%००.३०) | २१ (%००.७०) | ३० (%१००) |
| १८ | आजच्या तरुण पिढीचे धर्माबाबतचे दृष्टिकोन बदलले आहे का? | २४ (%००.८०) | ०६ (%००.२०) | ३० (%१००) |
| १९ | आज धर्माचा प्रभाव कमी होत आहे काय? | १७ (%६७.५६) | १३ (%३३.४३) | ३०(%१००) |
| २० | समाजात धर्मनिरपेक्षता आहे काय? | २४ (%००.८०) | ०६ (%००.२०) | ३०(%१००) |
| **५. शिक्षण संस्थेतील परिवर्तन** | | | | |
| २१ | मुलींनी मुलासारखे उच्च शिक्षण घ्यावे काय? | २४ (%००.८०) | ०६ (%००.२०) | ३०(%१००) |
| २२ | मुलींनी शहरात जाऊन शिक्षण घ्यावे काय ? | १७ (%६७.५६) | १३ (%३३.४३) | ३०(%१००) |
| **६. अर्थ संस्थेतील परिवर्तन** | | | | |
| २३ | मुलींनी बाहेर व्यवसाय, रोजगार करावा काय? | १७ (%६७.५६) | १३ (%३३.४३) | ३०(%१००) |
| २४ | समाजात व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य आहे काय? | ३० (%१००) | ०) ०(%००. | ३० (%१००) |
| २५ | समाजात वस्तू विनिमय पद्धत आहे काय? | ०) ०(%००. | ३० (%१००) | ३० (%१००) |
| २६ | शेती व्यतिरिक्त जोड व्यवसाय लोक करतात काय? | २४ (%००.८०) | ०६ (%००.२०) | ३०(%१००) |
| **७. राज्य संस्थेतील परिवर्तन** | | | | |
| २७ | महिलांनी राजकारण करायला पाहिजे काय? | २०(%६७.६६) | १०(%३३.३३) | ३०(%१००) |
| २८ | निवडणुकीत महिला सहभागी होतात काय? | १७ (%६७.५६) | १३ (%३३.४३) | ३०(%१००) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २९ | गावात प्राचीन पंचायत पद्धती अस्तित्वात आहे काय? | ०) ०(%००. | ३० (%१००) | ३० (%१००) |

**निष्कर्ष :**

भारतीय सामाजिक संस्थांमध्ये परिवर्तन ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. यामुळे समाज अधिक गतिशील, समतावादी व आधुनिक होत आहे. तरीही काही पारंपरिक मूल्यांचा विचार करून, सामाजिक समतोल राखणेही तितकेच गरजेचे आहे. परिवर्तन स्वीकारतानाच, त्याचे परिणाम समजून घेणे आणि समाजाच्या भल्यासाठी योग्य दिशा देणे ही आपली जबाबदारी आहे.

**कुटुंब संस्थांमध्ये झालेले परिवर्तन :**

- **विभक्त कुटुंब :** शहरीकरणामुळे विभक्त कुटुंबपद्धती वाढली.
- **महिला सक्षमीकरण :** महिलांचा शिक्षण व रोजगारातील सहभाग वाढल्यामुळे घरात त्यांची भूमिका बदलली आहे.

**विवाह संस्थांमध्ये झालेले परिवर्तन :**

- **आंतरजातीय/धर्मीय विवाहात वाढ :** शिक्षण व सोशल मीडियामुळे युवकांनी प्रेमविवाह स्वीकारायला सुरुवात केली.
- **लिव्ह-इन रिलेशनशिपचा उदय :** शहरी भागात विवाहाबाह्य सहजीवनाचा स्वीकार वाढत आहे.
- **विवाह वयात वाढ :** महिलांमध्ये उच्चशिक्षण व करिअरच्या प्राधान्यामुळे विवाह उशिरा होत आहेत.
- **स्त्री-पुरुष समानता :** महिलांना समाजात अधिक प्रतिष्ठा मिळू लागली.

**जाति संस्थांमध्ये झालेले परिवर्तन :**

- **आरक्षण प्रणाली :** मागासवर्गीयांसाठी संधी वाढवली गेली.
- **सामाजिक समतेच्या चळवळी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून अनेक सुधारकांनी जातिनिर्मूलनासाठी प्रयत्न केले.
- **व्यक्तिस्वातंत्र्यात वाढ :** विचार, निवड व कृती स्वातंत्र्य वाढले.

- **सामाजिक सुसंवाद व संघर्ष :** एकीकडे समतेची जाणीव वाढली, पण काहीवेळा सांस्कृतिक संघर्षही निर्माण झाला.

**धर्म संस्था संस्थांमध्ये झालेले परिवर्तन :**

- **धर्मनिरपेक्षता व घटनेतील समानता :** भारतीय संविधानामुळे सर्व धर्मांना समान अधिकार मिळाले.
- **धर्मगुरुंचा प्रभाव बदलला :** आध्यात्मिकता तर आहेच, पण वैज्ञानिक दृष्टिकोन वाढल्यामुळे अंधश्रद्धांवर मर्यादा आली.
- **धार्मिक सहिष्णुता :** सामाजिक विविधतेत एकता राखण्यासाठी सहिष्णुतेची गरज लक्षात आली आहे.
- **नैतिक मूल्यांमध्ये बदल :** परंपरागत नैतिकता झपाट्याने बदलत आहे, विशेषतः युवांमध्ये.

**शिक्षण संस्थांमध्ये झालेले परिवर्तन :**

- **मुलींचा शिक्षणातील सहभाग :** 'बेटी बचाओ, बेटी पढाओ'सारख्या मोहिमेमुळे मुली शिक्षण घेऊ लागल्या.
- **ग्रामीण-शहरी दरी कमी :** सरकारी योजना व ऑनलाइन माध्यमांमुळे शिक्षणात समता वाढली.

**अर्थ संस्थेतील परिवर्तन :**

- प्राचीन काळापासून सुरु असलेली वस्तू विनिमय पद्धत कालबाह्य होऊन समाजात मुद्रा विनिमयाचे पद्धत रूढ झाली आहे.
- आज समाजात लोकांना व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य मिळत आहे.

**राज्य संस्थेतील परिवर्तन :**

- आज पुरुषांप्रमाणे महिलांचा सुद्धा राजकरणात सहभाग वाढत असल्याचे दिसून येते.
- निवडणुकीत महिला सुद्धा मोठ्याप्रमाणात सहभागी होत असल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**


- शर्मा राजेन्द्र कुमार, ग्रामीण समाजशास्त्र, राजेन्द्र कुमार शर्मा एटलांटिक पब्लिशर्स एन्ड डिस्ट्रीब्यूटर्स

बी-2 विशाल एन्क्लेव, नई दिल्ली

- ढमढेरे एस. व्ही. , शिंदे एस. जी, भारतीय आणि जागतिक आर्थिक विकास, प्रथम आवृत्ती ( जुलै 2010) डायमंड पब्लिकेशन पूणे.
- कऱ्हाडे बी.एम., (2012), समाजशास्त्र परिचय, पिंपळापुरे ॲण्ड कं.पब्लिशर्स, नागपूर.
- पाटील वा. भा., पंचायत राज, नूतन मराठा महाविद्यालय जळगाव प्रशांत पब्लिकेशन.बोधनकर, अलोनी, सामाजिक संशोधन पद्धती ,साईनाथ प्रकशन ,नागपूर.
- इंटरनेट, वृत्तपत्र, मासिके